**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.६३/२०२३ मधील</u>**

**<u>निशाणी ५ वरील आदेश</u>**

अर्जदार हिने मूळ अर्ज जाबदार यांचेविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम १२, १८ ते २० व २२ अन्वये दाखल केला असून प्रस्तुतचा निशाणी ५ वरील अर्ज कलम २३ अन्वये दाखल केलेला आहे.

**<u>अर्जदार यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे</u>–**

०२. अर्जदारचे असे कथन आहे की, जाबदार क्र.१ व अर्जदार पती–पत्नी असून जाबदार क्र.१ व अर्जदारचा विवाह दि.२७/११/२०२० रोजी मौजे सोहोली, ता.कडेगांव, जि.सांगली येथे हिंदुधर्मशास्त्रातील रितीरिवाजानुसार विधीवत संपन्न झालेला होता. सदरील लग्नात अर्जदारचे आई–वडीलांनी कर्जाऊ रक्कम घेवून र.रू.२ ते ४ लाख रूपये खर्च करून संसारउपयोगी साहित्य, सोने–चांदीचे दागदागिने देवून जाबदार क्र.१ यांचे घरातील सर्वांचा व जाबदार क्र.१ यांचे नातेवाईकांचा योग्य तो मानपान करून विवाह संपन्न केलेला होता व आहे. सदरील जाबदार क्र.१ हा अर्जदारचा पती असून जाबदार क्र.२ हे अर्जदारचे सासरे, जाबदार क्र. ३ ही अर्जदारची सासू आहे. अर्जदार ही जाबदार क्र.१ ते ३ यांचेसोबत जाबदार क्र.१ ते ३ हे राहात असलेल्या ठिकाणी देवनार बेस्ट कॉलनी, देवनार, मुंबई येथे नांदणेस आलेले होते. जाबदार क्र.१ हा मुंबईतील भाभा अनुसंशोधन केंद्रात नोकरीस असून जाबदार क्र.२ हे बेस्ट, मुंबईचे ड्रायव्हर असून ते बेस्टच्या युनियनचे देखील काम बघतात.

०३. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, लग्नानंतर काही दिवसातच जाबदार क्र.१ याने अर्जदारचेबरोबर अतिशय विचित्र वागणेस सुरूवात करून, अर्जदारचेकडे सतत पाठ करून बसणे, अर्जदारचे सकाळी उठल्यानंतर तोंड न

बघणे, अर्जदारचेबरोबर न बोलणे, अर्जदार ही जेवली आहे का नाही याबाबत विचारणा न करणे, सतत अर्जदारला घालून पाडून बोलून जाबदार क्र.१ याला नवीन फ्लॅट घेणेसाठी र.रू.५,००,०००/– अर्जदारचे आई– वडीलांचेकडून घेवून येणेबाबत दरडावून सांगून अर्जदारला सतत शारिरीक व मानसिक त्रास देवून जाबदार क्र.२ व ३ यांचे सांगणे शिकवणेवरून मारहाण करीत होता.

०४. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, जाबदार क्र.३ हिने अर्जदारला तिचेजवळच रात्री झोपण्यास सांगितले व जाबदार क्र.३ ही देखील सकाळी उठल्यानंतर अर्जदारचे तोंड बघत नव्हती. सदरील जाबदार क्र.३ ही अर्जदार हिस "तुला, तुझे नवऱ्याजवळ झोपायचे असले तर माहेरहून फ्लॅट घेणेसाठी पैसे घेवून ये" असे म्हणून सदरील सा.वाली क्र.३ ही अर्जदारला, "आमच्याकडे बायकांना किमंत दिली जात नाही, बायकांचे आमच्या घरात काहीही चालत नाही" असे म्हणून सा.वाली क्र.३ ही अर्जदारला जाणीवपुर्वक लग्न झालेपासून त्रास देत आलेली होती व आहे.

०५. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, जाबदारने अचानकपणे चिडून जावून अर्जदारला गॅलरीत ओढत नेले व "तुझे व माझेमध्ये कधीही नवरा बायकोचे संबंध निर्माण होणार नाहीत, मी तुझ्याजवळ झोपू शकत नाही, तु माझ्या आयुष्यातून निघून जा, मला तु आवडत नाहीस, हे लग्न माझे घरच्यांचे इच्छेखातर मी तुझेबरोबर केलेले आहे, मी तुला शरीरसुख देणेस सक्षम नाही" असे सांगितलेने अर्जदारचे पायाखालची वाळूच सरकली होती. तरी देखील सदरील जाबदार क्र.१ हा अर्जदारला म्हणाली की, "माझे आई वडील हे रात्रभर जागेच असतात, ते जिवंत आहेत तोपर्यंत तुला त्यांची सेवाच करावी लागणार असून तु आमचे घरात मोलकरणीसारखेच आयुष्यभर जीवन काढावे लागणार आहे, सदरची बाब तु अन्य कोणाला सांगितलेस, गाठ माझ्याशी आहे" असे म्हणून जाबदार क्र.१ याने अर्जदारला जबरदस्त शारिरीक व मानसिक त्रास

दिलेला होता व आहे.

०६. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, मकरसंक्रातीचे सणावेळी जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिची साधी विचारपुस देखील केलेली नव्हती. तद्नंतर जाबदार क्र.१ यास सासरी घेवून जाणेसाठी अर्जदारचे मावशी–काकांनी फोन केला असता, "आम्हांला सुट्टया नाहीत, तु सणाला गेलीस, तुच माघारी ये, आम्ही येणार नाही" असे स्पष्टपणे सांगितलेले होते. तद्नंतर अर्जदार ही जाबदार क्र.१ ते ३ यांचे घरी सासरी गेली असता जाबदार क्र.१ ते ३ हे अर्जदारचे बरोबर विचित्रपणे वागू लागले. त्यांनी टोचून बोलणे, तिरस्कार करणे, नाक डोळे मोठे करणे, अपशब्द वापरणे, टोमणे मारणे इत्यादी प्रकारे अर्जदारला शारिरीक व मानसिक त्रास देणेस सुरूवात केली.

०७. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदारने घडलेला सर्व प्रकार अर्जदारची आई मुंबई येथे ८ फेब्रुवारी २०२१ रोजी अर्जदारचे सासरी आलेनंतर सांगितलेनंतर अर्जदारचे आईने जाबदार क्र.१ ते ३ यांना समजावून सांगणेचा प्रयत्न केला असता जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदारचे आईबरोबर भांडणतंटा करुन पाच लाख रुपयेची मागणी केली होती. तसेच तद्नंतर काही दिवस अर्जदार हिस व्यवस्थित नांदवलेचे नाटक करून सदरील मार्च २०२१ मध्ये सदरील जाबदार क्र.१ ते ३ यांनी एकमिलाफी होवून अर्जदार हिस फ्लॅटचे रकमेचे मागणीवरून मारहाण करून नेसत्या वस्त्रानिशी हाकलून दिलेले आहे. तद्नंतर सदरील अर्जदार व तिचे नातेवाईकांनी वारंवार प्रयत्न करून देखील जाबदार क्र.१ ते ३ हे अर्जदार हिस नांदावयास घेवून गेले नव्हते.

०८. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार व तिचे आई–वडीलांनी अर्जदारला जाबदार क्र.१ ते ३ यांनी नांदावयास घेवून जावे म्हणून बरेच प्रयत्न केलेनंतर सदरील जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिस नांदावयास घेवून

गेले होते. त्यावेळी सुरूवातीचे काही दिवस व्यवस्थित नांदवलेनंतर पुन्हा मागील तेच पुढे या उक्तीप्रमाणे जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिस शारिरीक व मानसिक त्रास देत होते. त्यावेळी म्हणजेच ऑगस्ट २०२१ मध्ये जाबदार क्र.३ या गावी आलेल्या असलेची बाब अर्जदार हिचे आईस व बहिणीला समजलेनंतर त्या दोघी दि.२५/०८/२०२१ रोजी जाबदारांचे गावी सोहोली येथे जाबदार क्र.३ यांना समजावून सांगणेसाठी गेलेल्या होत्या. त्यावेळी जाबदार क्र.३ हिने अर्जदारचे आईस अर्वाच्च भाषा वापरली व जाबदार क्र.३ ही अर्जदारचे आईचे अंगावर लोखंडी रॉड घेवून धावून येवून शिवीगाळ करून अर्जदारचे आईस व बहिणीस हाकलून दिले होते. त्यावेळी अर्जदारचे आईने जाबदार क्र.३ हिचे विरूद्ध कडेगांव पोलिस स्टेशन कडेगांव येथे एन.सी.आर.क्र.६६२/२०२१ ने दि.२५/०८/२०२१ रोजी तक्रारी अर्ज देखील दिलेला होता. दि.२६/०८/२०२१ रोजी जाबदार क्र.१ ने अर्जदारचे अंगावरील दागिने काढून घेतले होते.

०९. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, जाबदारांनी अर्जदारला तिचे आई–वडीलांसह नेसत्या वस्त्रानिशी दि.२६/०८/२०२१ रोजी हाकलून दिलेले होते व आहे. तद्नंतर देखील अर्जदार व तिचे नातेवाईकांनी प्रयत्न करून देखील जाबदार क्र.१ ते ३ हे अर्जदार हिस नांदावयास घेवून जात नसलेने सदरील अर्जदार हिने जाबदार क्र.१ ते ३ यांचेविरूद्ध विटा पोलिस स्टेशन विटा येथे एफ.आय.आर क्र.२४/२०२२ अन्वये भारतीय दंडविधान संहिता १८६० चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये तक्रार दाखल केली असून ती अद्यापी प्रलंबित आहे. सदरील जाबदार क्र.१ ते ३ हे कायद्याला न जुमानणारे इसम असून जाबदार क्र.१ ते ३ हे अर्जदारला वारंवार शिवीगाळ करून जीवे मारणेची धमकी देत असतात. अर्जदार ही महिला असून तिला कोणाचेही पाठबळ नाही.

१०. अर्जदारने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही जाबदार क्र.१ याने हाकलून दिलेपासून तिचे आई- वडीलांकडे खंबाळे (भा.), ता.खानापूर, जि. सांगली येथे तिचे माहेरी आश्रितासारखे जीवन जगत आहे. तसेच जाबदार क्र.१ याने पती म्हणून आजअखेर अर्जदार हिचे पालनपोषण, जेवणखान, कपडेलत्ते याची साधी विचारपुसही केलेली नाही किंवा त्याबाबत कोणत्याही प्रकारची सोयही केलेली नाही. सदरील जाबदार क्र.१ हा मुंबई येथील भाभा अनुसंशोधन केंद्रात नोकरीस असून त्यास दरमहा र.रू.७०,०००/- (अक्षरी रूपये सत्तर हजार मात्र) एवढा पगार आहे. तसेच जाबदार क्र.२ हे बेस्ट, मुंबईचे ड्रायव्हर असून त्यांना देखील दरमहा र.रू.५०,०००/- (अक्षरी रूपये पन्नास हजार मात्र) एवढा पगार आहे. तसेच सदरील जाबदार क्र.१ याचे मुंबई व मौजे सोहोली, ता.कडेगांव येथे स्वतःची राहती घरे देखील आहेत. तसेच जाबदारांची मौजे सोहोली, ता.कडेगांव, जि.सांगली येथे घर मिळकत असून ३ एकर शेतजमिन देखील आहे. सदरील शेत जमिन ही बागायती असून सदरील शेतजमिनीतून जाबदार क्र.१ यास वार्षिक खर्च वजा जाता र.रू.५,००,०००/- ते र.रू.७,००,०००/- (अक्षरी रूपये पाच ते सात लाख मात्र) एवढे उत्पन्न मिळते. सदरची केस चालून निकाल लागणेस बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे दरम्यानचे काळात जाबदारांचे उच्च राहणीमानाप्रमाणे मला अन्न, वस्त्र, निवारा, कपडालत्ता, औषधोपचारासाठी दरम्यानची पोटगी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. तरी अर्जदारला दरम्यानच्या पोटगीची नितांत आवश्यकता आहे म्हणून अर्जदार हिस दरमहा र.रू.१०,०००/- दरम्यानची पोटगी मिळावी ही विनंती.

**<u>जाबदार क्र.१ ते ३ यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे-</u>**

११. अर्जदारचे प्रस्तुत अर्जास जाबदार क्र.१ ते ३ यांनी निशाणी क्र.१६

वर त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल करुन त्यांनी अर्जदारचे अर्जातील व शपथपत्रातील सर्व मजकूर खोटा व लबाडीचा असलेचे कथन करुन तो जाबदार यांनी मान्य व कबूल केलेला नाही. जाबदार असे कथन करतात की, अर्जदार व जाबदार नं १ चा विवाह दि. २७/११/२०२० रोजी सोहोली, ता. कडेगाव, जि. सांगली येथे हिंदू धर्म रितीरीवाजा नुसार झालेला आहे. सदर विवाहानंतर अर्जदार ही जाबदारांचे घरी सोहोली येथे नांदणेस आले त्यावेळी ती जाबदार क्र.१ चे घरी कशीबाशी ५ दिवस राहीली व त्यानंतर माहेरी निघून गेली. अर्जदार व जाबदार क्र. १ यांच्या विवाहाचा खर्च जाबदार क्र.१ चे आईवडिलांनी केलेला होता. सदरील जाबदार क्र.१ चे आईवडिलांनी अर्जदार यांचे आईवडिलांना व नातेवाईकांना कसल्याही प्रकारची रक्कम मागितलेली नव्हती व नाही.

१२. जाबदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार हीस जाबदार नं.१ हा ५ दिवसानंतर मौजे सोहोली येथे घेऊन आला व लग्नाची पुजा केली. त्यानंतर तो मुंबई येथे अर्जदार यांना घेऊन आला. जाबदार क्र.१ हा मुंबई येथे बी. आर. सी. मध्ये कॉन्ट्रक्ट बेसीसवरती कामाला होता. त्यावेळी अर्जदार व जाबदार क्र. १ चे घरी भिवंडी येथे राहू लागले. त्यावेळी अर्जदार ही जाबदार क्र. १ सोबत सुरुवातीचे ५ ते ७ दिवस व्यवस्थीत राहिली. तद्नंतर अर्जदार ही संक्रातीच्या सणासाठी काकांचे घरी विक्रोळी येथे गेली. संक्रांत झालेनंतर जाबदार क्र.१ हा अर्जदार हीस आणणेसाठी तिच्या काकांच्या घरी गेला असता. तिच्या काकाने म्हणजेच नितीन देवकुळे यांनी जाबदार क्र.१ यास पुरुष असले बाबतचा मेडिकल टेस्ट करणेस सांगितले. त्यावेळी जाबदार क्र.१ यास धक्का बसल्याने जाबदार हे काकांचे घरुन निघून आले व घरी आले नंतर त्यांच्या वडिलांना म्हणजेच जाबदार क्र.२ यांना हकीकत सांगितली. त्यावेळी जाबदार क्र.२ यांनी विचारणा केली असता "तुम्ही येवून मुलगी घेऊन जावा" असे सांगितले. अर्जदार ही जाबदार क्र.१ यांना सांगत होती की "मला संसार करणेचा नाही, मला सोडचिठ्ठी द्या" असे

सांगू लागली. त्यानंतर जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हीस समजवून सांगितले की "आपला संसार व्यवस्थीत चालू आहे". त्यावेळी अर्जदार ही जाबदार क्र.१ यांना म्हणाली की "तुम्ही तुमच्या आईवडिलांना गावी पाठवा". त्यावेळी जाबदार क्र.१ ने त्यांच्या आईवडिलांना मौजे सोहोली येथे पाठवले.

१३. जाबदार यांचे पुढे असे कथन आहे की, तद्नंतर अर्जदार ही जाबदार क्र.२ यांचे वरती घाणेरडे आरोप करु लागली. जाबदार यांचे वडिलांना दारुचे ग्लास भरुन दे व माझे समोर नाच असे सांगू लागली. तसेच अर्जदार ही जाबदार क्र.१ यांनी आणलेले कपडे घालत नसे व आणलेले खायला फेकून देत असे व जाबदार क्र.१ यास विनाकारण त्रास देत असे. तसेच जाबदार क्र.१ ला "तू हिजडा आहेस, तुझ्यापासून मुलबाळ होत नाही" असे घालून पाडून बोलत असे. तरी देखील जाबदार क्र.१ यांची अर्जदार बरोबर संसार करण्याची प्रामाणिक इच्छा असल्यामुळे तिच्या बरोबर संसार करत होता.

१४. जाबदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार ही कशीबशी २ ते ३ महिने नांदली. तद्नंतर दि. ०७/०५/२०२१ रोजी कोणासही न सांगता तिचे दागिणे व इतर साहित्य घेऊन घरातून निघून गेली. जाबदार क्र.१ यांनी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. जाबदार क्र.१ यांनी मध्यस्थ्यामार्फत तिला नांदायला आणण्याचा प्रयत्न केला असता अर्जदार आजअखेर नांदण्यास आली नाही. अर्जदार ही स्वतःहून निघून गेलेली आहे. अर्जदार हिचे आडमुठे वागणेमुळे जाबदार क्र.१ यांची नोकरी गेली आहे. जाबदार क्र.१ यांना सध्या काहीएक कामधंदा नाही. तो कसाबसा जीवन जगत आहे. व जाबदार नं २ ते ३ हे सध्या मुंबई येथे राहणेस आहेत. अर्जदार ही शिलाई मशीनचा व्यवसाय करत असून त्यापासून तिला दरमहा र.रु.१५०००/- इतके उत्पन्न मिळते. त्यामुळे ती स्वतःचा चरितार्थ चालवण्यास समर्थ आहे. जाबदार यांची अर्जदार हीस उचलून पोटगी देणेची ऐपत नाही. अर्जदारचा दरम्यानचा पोटगी अर्ज खर्चासह रद्द करणेत

यावा अशी विनंती जाबदार यांनी केली आहे.

१५. प्रस्तुतकामी अर्जदारातर्फे ॲड. एम.एस. शानभाग यांचा व जाबदार क्र.१ ते ३ तर्फे ॲड. के.आर. उथळे यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार व जाबदार यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन पुढील विचाराधीन बाबी उपस्थित होतात. त्यांची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे नोंदवीत आहे;

| अ.क्र. | विचाराधीन बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिचेवर जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे, ही बाब तिने प्रथमदर्शनी सिध्द केलेली आहे काय? | होय |
| २. | जाबदार यांनी संयुक्तिक कारण नसताना अर्जदारच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही, ही बाब अर्जदार हिने प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय ? | होय |
| ३. | अर्जदार ही जाबदार क्र.१ यांचेकडून दरमहा रक्कम रुपये १०,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होय |
| ४. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**विचाराधीन बाब क्र.१ बाबतः-**

१६. प्रस्तुतचा कायदा हा स्त्रियांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात आलेला आहे. उभय पक्षकार जे एकमेकांवर आरोप करत आहेत त्याबाबत पुरावा येणे

अद्याप बाकी आहे. प्रस्तुतचा अंतरिम पोटगी मिळण्याच्या अर्जाचा विचार करताना अर्जदार क्र.१ हिच्यावर जाबदार यांच्याकडून कौटुंबिक हिंसाचार झाला आहे, ही बाब अर्जदार हिने प्रथमदर्शनी सिध्द केली पाहिजे. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचा विवाह झालेची बाब निर्विवादित आहे. अर्जदार हिच्या कथनानुसार, लग्नानंतर काही दिवसातच जाबदार क्र.१ याने अर्जदारचेबरोबर अतिशय विचित्र वागणेस सुरूवात करून, अर्जदारचेकडे सतत पाठ करून बसणे, अर्जदारचे सकाळी उठल्यानंतर तोंड न बघणे, अर्जदारचेबरोबर न बोलणे, अर्जदार ही जेवली आहे का नाही याबाबत विचारणा न करणे, सतत अर्जदारला घालून पाडून बोलून जाबदार क्र.१ याला नवीन फ्लॅट घेणेसाठी र.रू.५,००,०००/– अर्जदारचे आई–वडीलांचेकडून घेवून येणेबाबत दरडावून सांगून अर्जदारला सतत शारिरीक व मानसिक त्रास देवून जाबदार क्र.२ व ३ यांचे सांगणे शिकवणेवरून मारहाण करीत होता. जाबदार क्र.३ ही अर्जदार हिस "तुला, तुझे नवऱ्याजवळ झोपायचे असेल तर माहेरहून फ्लॅट घेणेसाठी पैसे घेवून ये" असे म्हणून सदरील सा.वाली क्र.३ ही अर्जदारला, "आमच्याकडे बायकांना किमंत दिली जात नाही, बायकांचे आमच्या घरात काहीही चालत नाही" असे म्हणून सा.वाली क्र.३ ही अर्जदारला जाणीवपुर्वक लग्न झालेपासून त्रास देत आलेली होती व आहे.

१७. अर्जदारचे कथनानुसार जाबदार क्र.१ ने अचानकपणे चिडून जावून अर्जदारला गॅलरीत ओढत नेले व "तुझे व माझेमध्ये कधीही नवरा बायकोचे संबंध निर्माण होणार नाहीत, मी तुझ्याजवळ झोपू शकत नाही, तु माझ्या आयुष्यातून निघून जा, मला तु आवडत नाहीस, हे लग्न माझे घरच्यांचे इच्छेखातर मी तुझेबरोबर केलेले आहे, मी तुला शरीरसुख देणेस सक्षम नाही" असे सांगितले होते. अर्जदार ही मकर संक्रात सणानंतर जाबदार क्र.१ ते ३ यांचे घरी सासरी गेली असता जाबदार क्र.१ ते ३ हे अर्जदारचे बरोबर विचित्रपणे वागू लागले. त्यांनी टोचून बोलणे, तिरस्कार करणे, नाक डोळे मोठे करणे, अपशब्द वापरणे,

टोमणे मारणे इत्यादी प्रकारे अर्जदारला शारिरीक व मानसिक त्रास देणेस सुरूवात केली. अर्जदारचे आईने जाबदार क्र.१ ते ३ यांना समजावून सांगणेचा प्रयत्न केला असता जाबदार क्र.१ ते ३ यांनी अर्जदारचे आईबरोबर भांडणतंटा करुन पाच लाख रुपयेची मागणी केली होती. तसेच तद्नंतर काही दिवस अर्जदार हिस व्यवस्थित नांदवलेचे नाटक करून सदरील मार्च २०२१ मध्ये सदरील जाबदार क्र.१ ते ३ यांनी एकमिलाफी होवून अर्जदार हिस फ्लॅटचे रकमेचे मागणीवरून मारहाण करून नेसत्या वस्त्रानिशी हाकलून दिलेले आहे.

१८. अर्जदारचे कथनानुसार अर्जदार हिची आई व बहिण दि.२५/०८/२०२१ रोजी जाबदारांचे गावी सोहोली येथे जाबदार क्र.३ यांना समजावून सांगणेसाठी गेलेल्या होत्या. त्यावेळी जाबदार क्र.३ हिने अर्जदारचे आईस अर्वाच्च भाषा वापरली व जाबदार क्र.३ ही अर्जदारचे आईचे अंगावर लोखंडी रॉड घेवून धावून येवून शिवीगाळ करून अर्जदारचे आईस व बहिणीस हाकलून दिले होते. त्यावेळी अर्जदारचे आईने जाबदार क्र.३ हिचेविरूद्ध कडेगांव पोलिस स्टेशन येथे एन.सी.आर.क्र.६६२/२०२१ ने दि.२५/०८/२०२१ रोजी तक्रारी अर्ज देखील दिलेला होता. दि.२६/०८/२०२१ रोजी जाबदार क्र.१ ने अर्जदारचे अंगावरील दागिने काढून घेतले होते. अर्जदार हिने जाबदार क्र.१ ते ३ यांचेविरूद्ध विटा पोलिस स्टेशन विटा येथे एफ.आय.आर क्र.२४/२०२२ अन्वये भारतीय दंडविधान संहिता १८६० चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये तक्रार दाखल केली असून ती अद्यापी प्रलंबित आहे. ही सर्व कथने अर्जदार हिने शपथपत्र सादर करुन केलेली आहेत.

१९. याउलट, जाबदार यांचे कथनांप्रमाणे अर्जदार व जाबदार क्र.१ यांच्या विवाहाचा खर्च जाबदार क्र.१ चे आईवडिलांनी केलेला होता. सदरील जाबदार क्र.१ चे आईवडिलांनी अर्जदार यांचे आईवडिलांना व नातेवाईकांना कसल्याही प्रकारची रक्कम मागितलेली नव्हती व नाही. अर्जदार ही जाबदार क्र.१

सोबत सुरुवातीचे ५ ते ७ दिवस व्यवस्थित राहिली. संक्रांत झालेनंतर जाबदार क्र.१ हा अर्जदार हीस आणणेसाठी तिच्या काकांच्या घरी गेला असता. तिच्या काकाने म्हणजेच नितीन देवकुळे यांनी जाबदार क्र.१ यास पुरुष असलेबाबतची मेडिकल टेस्ट करणेस सांगितले. अर्जदार ही जाबदार क्र.१ यांना सांगत होती की "मला संसार करणेचा नाही, मला सोडचिठ्ठी द्या" असे सांगू लागली. त्यानंतर जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हीस समजवून सांगितले की "आपला संसार व्यवस्थित चालू आहे". त्यावेळी अर्जदार ही जाबदार क्र.१ यांना म्हणाली की "तुम्ही तुमच्या आईवडिलांना गावी पाठवा". त्यावेळी जाबदार क्र.१ ने त्यांच्या आईवडिलांना मौजे सोहोली येथे पाठवले.

२०. जाबदार यांचे कथनाप्रमाणे, अर्जदार ही जाबदार क्र.२ यांचे वरती घाणेरडे आरोप करु लागली. जाबदार यांचे वडिलांना दारुचे ग्लास भरुन दे व माझे समोर नाच असे सांगू लागली. तसेच अर्जदार ही जाबदार क्र.१ यांनी आणलेले कपडे घालत नसे व आणलेले खायला फेकून देत असे व जाबदार क्र.१ यास विनाकारण त्रास देत असे. तसेच जाबदार क्र.१ ला "तू हिजडा आहेस, तुझ्यापासून मुलबाळ होत नाही" असे घालून पाडून बोलत असे. तरी देखील जाबदार क्र.१ यांची अर्जदार बरोबर संसार करण्याची प्रामाणिक इच्छा असल्यामुळे तो तिच्याबरोबर संसार करत होता.

२१. जाबदारचे कथनाप्रमाणे, अर्जदार ही कशीबशी २ ते ३ महिने नांदली. तद्नंतर दि.०७/०५/२०२१ रोजी कोणासही न सांगता तिचे दागिणे व इतर साहित्य घेऊन घरातून निघून गेली. जाबदार क्र.१ यांनी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. जाबदार क्र.१ यांनी मध्यस्थ्यामार्फत तिला नांदायला आणण्याचा प्रयत्न केला असता अर्जदार आजअखेर नांदण्यास आली नाही. अर्जदार ही स्वतःहून निघून गेलेली आहे. अर्जदार हिचे आडमुठे वागणेमुळे जाबदार क्र.१ यांची नोकरी गेली आहे. जाबदार क्र.१ यांना सध्या काहीएक कामधंदा नाही. तो

कसाबसा जीवन जगत आहे. व जाबदार नं २ ते ३ हे सध्या मुंबई येथे राहणेस आहेत, अशी कथने जाबदार यांनी केली आहेत.

२२. अर्जदार हिने तिला जाबदार यांनी दिलेल्या मानसिक व शारीरिक त्रासाबाबत शपथेवर कथन केलेले आहे. अर्जदार ही कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय जाबदार यांना सोडून गेली असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द झाले, असे म्हणता येणार नाही. अर्जदार व जाबदार क्र.१ चे पती–पत्नीचे नाते अद्याप अस्तित्वात आहे. जाबदार क्र.१ हा अर्जदारचा पती असून तिचे उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी पती या नात्याने जाबदार क्र.१ यांच्यावर आहे. अर्जदारचे असे म्हणणे आहे की, जाबदार क्र.१ यांनी त्यांना पूर्णपणे दुर्लक्षीत केलेले असून तिची कोणतीही सोय त्याने केलेली नाही व ती आश्रितासारखे जीवन जगत आहे. कोणतीही भारतीय स्त्री ही कोणतेही संयुक्तिक कारण नसताना विनाकारण तिच्या पतीविरुध्द तो तिच्या उदरनिर्वाहाची सोय करत नाही किंवा तिला दुर्लक्षित करत आहे, तसेच तिचेवर हिंसाचार झालेची बाब शपथेवर खोटे कथन करेल, असे गृहीत धरणे उचित होणार नाही. जाबदार यांचेवर आय.पी.सी. कलम ४९८–अ अन्वये विटा न्यायालयात खटला प्रलंबीत आहे. तसेच निशाणी क्र.१९ सोबतचे कौटुंबिक घटना अहवाल व उपलब्ध पुराव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जदार हिचेवर जाबदार यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार झालेची बाब प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे, विचाराधीन बाब क्र.१ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन बाब क्र.२ व ३ बाबतः–**

२३. जाबदार क्र.१ हा अर्जदारचा पती असून अर्जदारची उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी पती या नात्याने जाबदार क्र.१ यांच्यावर आहे. अर्जदारचे असे म्हणणे आहे की, अर्जदारला नाईलाजास्तव तिच्या माहेरी आश्रितासारखे जीवन

जगावे लागत आहे. जाबदार यांनी त्यांना पूर्णपणे दुर्लक्षीत केलेले आहे व त्यांची कोणतीही सोय जाबदार यांनी केलेली नाही. कोणतीही भारतीय स्त्री ही कोणतेही संयुक्तिक कारण नसताना विनाकारण तिच्या पतीविरुध्द तो तिच्या उदरनिर्वाहाची सोय करत नाही किंवा तिला दुर्लक्षित करत आहे असे शपथेवर खोटे कथन करेल, असे गृहीत धरणे उचित होणार नाही. जाबदार क्र.१ याने अर्जदारची अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार व इतर आवश्यक दैनंदिन गरजा पुरविण्याची कोणतीही सोय केली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. पती या नात्याने अर्जदारचा सर्व उदरनिर्वाहाचा, दैनंदिन खर्च, औषधोपचाराचा खर्च जाबदार क्र.१ यांनी पुरविणे ही त्यांची नैतिक व कायदेशीर जबाबदारी व कर्तव्य आहे. त्यामुळे, अर्जदार यांना लागणारा अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार व इतर आवश्यक दैनंदिन गरजा या बाबींचा विचार करता अर्जदार यांना दरम्यानची पोटगी देणे न्यायोचित व गरजेचे वाटते.

२४. दरम्यानची पोटगी ठरविताना जाबदार यांचे उत्पन्नाचे साधन व त्याच्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्या या गोष्टी विचारात घेणे जरुरीचे आहे. अर्जदारचे शपथेवरील कथनाप्रमाणे जाबदार क्र.१ हा मुंबई येथील भाभा अनुसंशोधन केंद्रात नोकरीस असून त्यास दरमहा र.रू.७०,०००/- (अक्षरी रूपये सत्तर हजार मात्र) एवढा पगार आहे. तसेच जाबदार क्र.२ हे बेस्ट, मुंबईचे ड्रायव्हर असून त्यांना देखील दरमहा र.रू.५०,०००/- (अक्षरी रूपये पन्नास हजार मात्र) एवढा पगार आहे. तसेच सदरील जाबदार क्र.१ याचे मुंबई व मौजे सोहोली, ता.कडेगांव येथे स्वतःची राहती घरे देखील आहेत. तसेच जाबदारांची मौजे सोहोली, ता.कडेगांव, जि.सांगली येथे घर मिळकत असून ३ एकर शेतजमिन देखील आहे. सदरील शेत जमिन ही बागायती असून सदरील शेतजमिनीतून जाबदार क्र.१ यास वार्षिक खर्च वजा जाता र.रू.५,००,०००/- ते र.रू.७,००,०००/- (अक्षरी

रूपये पाच ते सात लाख मात्र) एवढे उत्पन्न मिळते. त्यामुळे, जाबदार क्र.१ हा अर्जदारला पोटगी देण्यास सक्षम आहे, अशी कथने अर्जदार हिने शपथेवर केलेली आहेत.

२५. याउलट जाबदार क्र.१ यांचे असे कथन आहे की, अर्जदार हिचे आडमुठे वागणेमुळे जाबदार क्र.१ यांची नोकरी गेली आहे. जाबदार क्र.१ यांना सध्या काहीएक कामधंदा नाही. तो कसाबसा जीवन जगत आहे. अर्जदार ही शिलाई मशीनचा व्यवसाय करत असून तिला त्यातून दरमहा र.रु.१५०००/– इतके उत्पन्न मिळते.

२६. अर्जदार हिने जाबदार यास रु.७०,०००/– पगार असलेबाबतचा पगार दाखला वगैरे पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. तसेच जाबदार यांनी अर्जदार हिला रु.१५,०००/– शिलाई व्यवसायातून मिळत असलेबाबत पुरावा देखील सादर केलेला नाही. अर्जदारने शेतीपासून देखील जाबदार यांना उत्पन्न मिळत असलेचे कथन केले आहे. अर्जदारने अभिलेखावर जाबदार क्र.२ यांचे नांवे शेती असलेबाबत ७/१२ उतारे सादर केले आहेत. तसेच अभिलेखाचा एकंदरीत विचार करता जाबदार हा धडधाकट असलेचा दिसून येतो. जाबदार क्र.१ ने बी.ए.आर.सी., मुंबई येथे कंत्राटी तत्वावर काम करत होतो, असे मान्य देखील केलेले आहे. त्यामुळे, सदर जाबदार क्र.१ हा कमावता व्यक्ती असलेचे दिसून येते. अर्जदार ही जाबदार क्र.१ ची पत्नी असलेने तिची जबाबदारी जाबदार क्र.१ यास नाकारता येणार नाही. मूळ अर्जाचा गुणदोषावर काम चालून अंतिम निकाल लागण्यास कालावधी लागणार आहे व अर्जदारला पालनपोषण, निवारा, कपडेलत्ते, औषधोपचार इ. साठी माहेरचे लोकांवर आश्रितासारखे अवलंबून राहावे लागत असलेचे गृहीत धरुन व सध्याची महागाई गृहीत धरुन अर्जदारला दरम्यानची पोटगी म्हणून दरमहा रु.५,०००/– अर्ज दाखल तारखेपासून केसचा

अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावी, असे निर्देश जाबदार क्र.१ यांना देणे संयुक्तिक व उचित वाटते. सबब, विचाराधीन बाब क्र.२ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे व विचाराधीन बाब क्र.३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

**आदेश**

१. अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार सौ.अमृता विनायक वायदंडे हिला अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रु.५,०००/– (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) दरम्यानची पोटगी म्हणून जाबदार क्र.१ यांनी द्यावी.

३. उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Sd/-

विटा.
दिनांकः–०६.१२.२०२३.

(मो.शारीक ए.यु.रहेमान)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad, |
| Name of the Court | :- | M.S.A.U.Rahman,<br>Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 06.12.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 06.12.2023 |
| Order uploaded on | :- | 06.12.2023. |